# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
EMAIL ID : 146election2024@gmail.com

**जा.क्र./निवडणुक/कावि-९६ /2023-24** **दि.१२/०८/2024**

निवडणुक तात्काळ

## // प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.10/04/2024 रोजी जेसल पार्क मच्छीमार्केट , भाईंदर पुर्व येथे सकाळी 11.00 ते 12.00 वाजे पर्यंत तसेच इंद्रलोक, गोडदेव मराठी शाळा, भाईंदर पुर्व येथे सायकाळी 05.00 ते 6.00 पर्यंत महीला बचत गटासमवेत स्वीप (sveep) अंतर्गत जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

स्वीप (sveep) पथक प्रमुख श्री. कैलास शेवंते यांनी उपस्थीत महीला बचतगटातील महीलांचे स्वागत करुन मतदार नोंदणी दि.23/04/2024 पर्यंत सुरु आहे. नोंदणी करीता nvsp.in व voterghelpline चा online वापर करावा. काही अडचण आल्यास नजिकच्या प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधावा असे सांगुन 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप (sveep) नोडल अधिकारी श्री. सुनील यादव यांना महीलांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. 25 ठाणे लोकसभा मतदार संघाची निवडणुक दि.20/05/2024 सोमवार या दिवशी जाहीर झाली असुन सदर दिवशी मतदान असल्याने कुठेही फिरायला न जाता सर्व नागरीकांनी मतदार यादीत नाव असलेल्या आपल्या कुटुंबियास (आई,वडील,भाउ,बहीण,मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान स्वीप (sveep) नोडल अधिकारी श्री. सुनील यादव यांनी केले.

महीला बचतगटाच्या भाईंदर पुर्व विभागाच्या महीलांच्या प्रमुख श्रीम. अस्मीता रोकडे यांनी महीलांनी आपल्या विभागातील कमीत कमी 100 महीलांना भेटुन माहीती दयावी तसेच मतदान करणे का गरजेचे आहे याबाबत माहीती दिली. त्यावेळी 2/3 महीलांनी आपले विचार मांडले व सेल्फी बोर्डावर फोटो काढले तसेच आम्ही मतदान करणार व दुस-यांना मतदान करण्यास प्रोत्साहीत करणार असे सागिंतले.

समाजविकास विभागातील महीला बचत गटाचे व्यसस्थापक संजय हिनवळ यांनी मतदार नोंदणी व मतदार जनजागृजी संदर्भात महीलांना माहीती दिली.

सदर कार्यक्रमास 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी श्री. सुनील यादव स्वीप(sveep) पथक प्रमुख श्री. कैलास शेवंते व कर्मची वर्ग, महीला बचत गटाच्या भाईदर पुर्व महीलांच्या प्रमुख श्रीम. अस्मीता रोकडे, समाजविकास विभागातील महीला बचत गटाचे व्यसस्थापक संजय हिनवळ, महीला बचतगटाच्या महीला तसेच जेसल पार्क येथे मच्छी विक्रेते, गि-हाईक, नागरीक वर्ग उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मतदार नोंदणी करुन दि.20/05/2024 रोजी सर्वांनी मतदान करावे तसेच मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या बददल 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी श्री. सुनील यादव यांनी सर्वाचे आभार मानले.

12.8.2024

(रवी पवार)
उपायुक्त(मु.) तथा जिल्हा नोडल अधिकारी
स्वीप 146 ओवळा माजीवडा वि.म.स.